दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२२ एप्रिल २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यात भारनियमन जाहीर ; अदानींमुळे अचानक वीज टंचाई : ना.नितीन राऊत




**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात कोळशाच्या टंचाईमुळे वीजेचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवू लागला आहे. यावर दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. राज्यातील औष्णिक विद्युत प्रकल्पांतून आठ हजार मेगावॅट वीज निर्माण करण्याचे आदेश दिले आहेत.

कोल माईनमधील कर्मचाऱ्याचा स्टाईक झाला होता, डिझेलचे दरही वाढल्याने त्याचा परिणाम कोळशाच्या टंचाईवर झाला आहे. केंद्रीय मंत्र्यांनी रेल्वे आम्हाला रेल्वे कोळसा आणण्यासाठी रेल्वे गाड्याच देत नसल्याचे सांगत हात झटकले आहेत. आम्ही गेल्याच आठवड्यात राज्यात भारनियमन होणार नाही, असे आश्वासन दिले होते. परंतू परिस्थिती बदलली आहे, असे राज्याचे ऊर्जा मंत्री नितीन राऊत यांनी म्हटले आहे. याचबरोबर त्यांनी राज्यात भारनियमन होणार असल्याची घोषणा केली आहे.

अदानी पावर कंपनीने अचानकपणे तिरोडा प्लँटमधील पुरवठा बंद केला. ३१०० मेगावॅटचा करार आहे, सप्लाय १७६५ मेगावॅट केला. त्यांच्याकडून चौदाशे मेगावॅट वीज कमी मिळाली. अचानक त्यांनी हा निर्णय घेतला. जेएसडब्लूकडून १०० मेगावॅट वीज मिळायची, परंतू त्यांचा प्लँट बंद झाल्याने ती मिळत नाही. सीजीपीएलसोबत जो करार होता त्यानुसारही मागणी केली होती, ७६० मेगावॅट वीज मागितली आहे. त्यांनी ६३० मेगावॅट वीज दिली. आम्हाला वीज मिळत नाहीय, यामुळे आम्हाला भारनियमन करावे लागत आहे, असे ते म्हणाले.

हे भारनियमन कधी संपेल हे सांगता येणार नाही. यामुळे नागरिकांनी वीजेच्या वापरावर काटकसर करावी. भारनियमनाचे वेळापत्रक प्रसिद्ध केले जाईल, तुम्हाला मेसेज, व्हॉट्सअप द्वारे कळवू. आम्हाला जर १५०० मेगावॅट वीज कुठूनही मिळाली तर आम्ही भारनियमन रद्द करू. हवामान खात्याने चार पाच दिवस पाऊस पडेल असे म्हटले आहे. हा पाऊस जरी पडला तरी दिलासा मिळेल, असे नितीन राऊत म्हणाले.

भारनियमन जे केले जाते त्याची सर्वात मोठे नुकसान बिले भरलेली नाहीत तिथे केले जाईल. वीज चोरी जिथे अधिक होते. तिथे भारनियमन करण्याचे आदेश दिले आहे. ही जिल्ह्यांमध्ये काही काही भाग असतात, त्यामुळे नेमके भाग सांगू शकत नाही, असेही राऊत म्हणाले.

# सर्वसामान्य जनतेचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी शासन प्रयत्नशील : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेचे आरोग्य निरोगी राहावे यासाठी शासन विविध स्तरांवर प्रयत्नशील आहे. म्हणूनच केंद्र शासन आणि महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या माध्यमातून भव्य आरोग्य मेळावा, मोफत तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी अलिबाग येथे सर्व रोग निदान आरोग्य मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी केले.


स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय आरोग्य अभियान व सार्वजनिक आर–ोग्य विभाग महाराष्ट्र शासन आयोजित सर्वरोग निदान आरोग्य मेळावा चे उद्घाटन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते आज जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग–रायगड येथे संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी श्री.अमोल यादव, अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय एस.एम.सोनुने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक रायगड डॉ.प्रमोद गवई, उपविभागीय अधिकारी श्री.प्रशांत ढगे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) डॉ.गजानन गुंजकर, प्रशासकीय अधिकारी वर्ग १, वैद्यकीय महाविद्यालय श्री.सुनील चव्हाण, प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय श्री.पी.डी. धामोडा तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील विविध विभागांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, अधिसेविका, अधिपरिचारिका, अधिकारी व कर्मचारी व सर्व रोग निदान शिबिराकरिता आ–लेले रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा सामान्य रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अलिबाग यांच्यामार्फत आयोजित केलेला आरोग्य मेळावा स्तुत्य असून रुग्ण सेवेच्या दृष्टीने उपयोगी असल्याचे सांगून या उपक्रमाचे कौतुक केले. अनेक नवीन उपक्रम राबवित असताना, खऱ्या अर्थाने शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांचा प्रसार करणे गरजेचे आहे. अनेक वेळा नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा शासकीय रुग्णालयात मिळतात याची माहिती नसल्याने ते खासगी रुग्णालयात जात असतात. त्यांना त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार कोणत्या प्रकारचे लाभ मिळू शकतील यांची माहितीसुद्धा नसते. महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेत अनेक आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. या योजनेंतर्गत खासगी रुग्णालयात दोन टक्के खाटा उपलब्ध आहेत, आता ती संख्या चार टक्के इतकी नेण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत

.../२

# अतिरिक्त सुरक्षा रक्कमेच्या वीज बिलामुळे ग्राहकांना शॉक



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील वीज ग्राहकांना सुरक्षा रक्कम भरण्याच्या नावाखाली दोन दोन वीज बिल आल्याने विज ग्राहकांना शॉक बसला आहे. वीज ग्राहकांना या महिन्यात दोन वीज बिले महावितरणकडून दिली गेली आहेत. एक वीज बिल व दुसरा अतिरिक्त सुरक्षा रकमेच्या नावाने बिल आल्याचे पाहून ग्राहक हैराण झाला आहे. ही सुरक्षा रक्कम कसली असे विचारण्यासाठी महावितरणच्या कार्यालयात ग्राहक गेले असता महावितरणच्या कर्मचाऱ्यांना काही उत्तर देता आले नाही. त्यामुळे मुरुड मधील वीजग्राहक संतप्त झाला आहे.

दोन वर्षांच्या प्रदीर्घ कोरोना कालखंडात अनेक नागरिकांची आर्थिक परिस्थिती अजूनही बेताची आहे. त्यात वाढती महागाईने ग्रासलेल्या ग्राहकांची महावितरण अतिरिक्त वीज बिल आकारत सुरक्षा रक्कमेच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा रक्कम वसूल करत आहे. यासंदर्भात ग्राहकांनी महावितरणच्या कार्यालयात जाऊन कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता त्यांना काहीच उत्तर देता आले नाही.

आधीच महावितरण नको–नको ते आकार आकारून वीज ग्राहकांना हैराण करून टाकत आहे. स्थिर आकार, वीज आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क, वीज विक्रीकर, इतर आकार अशा सात प्रकारच्या आकाराच्या नावाखाली महावितरण भरमसाठ वीज बिल ग्राहकांच्या माथी मारत आहे. या महिन्यात अतिरिक्त सुरक्षा रकमेच्या नावाने वीज बिल देऊन वीज ग्राहकांना शॉक देत आहे.

जर वीज बिल भरले नाहीत तर तुमचे वीज तोडण्यात येईल असे सांगण्यात येते. त्यामुळे वीज ग्राहक घाबरून वीज बिल भरत आहेत. कित्येक वीज ग्राहकांना त्यांचे मीटर बंद असल्याने सरासरी विज बिल ग्राहकांच्या माथी मारत आहे. मीटर बदलण्याची मागणी केली असता त्यांना नवीन मीटर उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करत आहेत. महावितरणच्या अशा गैर सुविधेमुळे वीज ग्राहक पुरता हैराण झाला आहे.

## संक्षिप्त...

### काँग्रेसमध्ये २४ वर्षांपासून निवडणुकाच झालेल्या नाहीत : आ.पृथ्वीराज चव्हाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अलीकडेच झालेल्या ५ राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसचा मोठा पराभव झाला. त्यामुळे आमचे कार्यकर्ते अजूनही वैफल्यग्रस्त भावनेत आहेत. त्यांना सावरण्याचे काम दिल्लीत पक्षाध्यक्षा सोनिया गांधी वेगवेगळ्या पद्धतीने करत आहेत, असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री, राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे.

जी–२३ गटाबाबत विचारले असता, जी–२३ गट असे काही नाही. पण केंद्रीय मंत्रीपद, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, मुख्यमंत्री अशी महत्त्वाची पदे भूषवलेल्या नेत्यांनी एकत्र येऊन काँग्रेस पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांच्याशी संवाद साधावा, असे ठरले. कारण, कोरोना काळात त्यांची भेट होणे शक्य नव्हते. सोनिया गांधी यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिनाभर वाट पाहूनही ते घडत नव्हते. सोनिया गांधी यांनी अंतरिम पद स्वीकारून एक वर्ष झाले होते. मात्र, अंतरिम पद कायमस्वरुपी ठेवण्यासारखे नव्हते. मात्र, सोनिया गांधींची तब्येत बरी नव्हती, कोरोना होता. शेवटी २३ जणांनी एकत्रितपणे येऊन सोनिया गांधींना पत्र लिहिले, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

**पाहिजेत**
मराठी, इंग्रजी टायपिंगचे तसेच इंटरनेट ज्ञान असलेले मुले–मुली पाहिजेत.
: संपर्क :
९७६९०११६६७

# संत गाडगेबाबांचे काम हे मानवतेचे काम असल्याने ते निरंतन पुढे चालतच रहावे : ना.यशोमती ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

संत गाडगेबाबा यांनी समाजासाठी केलेले काम हे मानवतेचे काम असल्याने ते पुढे निरंतन पुढे सुरू राहणारच आहे. अशा कामामुळे ऊर्जा मिळत असते. त्यामुळेच सर्वांनी या चांगल्या गोष्टी समाजापुढे न्यायला पाहिजे जो पर्यंत ही पृथ्वी अस्तित्वात आहे चंद्र, सुर्य, तारे अहेत तो पर्यंत हे काम पुढे चालूच राहणार आहे, यसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे असे प्रतिपादन आज महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री तथा श्री गाडगे महाराज मिशन मुंबईच्या अध्यक्षा ॲड.यशोमती ठाकूर यांनी खारघर येथे आयोजित नुतन धर्म शाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी केले.

कै.सतीश हावरे यांच्या स्मरणार्थ श्रीमती. उज्वलाताई सतीश हावरे यांनी श्री गाडगे महाराज मिशन या संस्थेस खारघर येथे रुग्ण सेवेसाठी एक तीन मजली सदन सेक्टर २०, शारदा सदन खारघर येथे विनामुल्य उपलब्ध करून दिले. या सदनाचे उद्‌घाटन महिला व बालविकास मंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ.प्रशांत ठाकूर, हावरे इंजिनिअर्स ॲण्ड बिल्डर प्रा.लि.च्या श्रीमती.उज्वलाताई हावरे, श्री गाडगे महाराज मिशनचे कार्याध्यक्ष मधुसूदन मोहिते, उपाध्यक्ष उत्तमराव देशमुख, सचिव विश्वनाथ ना–चवणे, सचिव सचिन घोंगटे, खजिनदार ज्ञानदेव महाकाळ, अशोक पाटील, गाडगे महाराजांचे त्या काळातील चालक ९३ वर्षीय भाऊरावजी काळे, प्रवीण हावरे, नगरसेविका नेत्रा पाटील, ब्रिजेश पटेल यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी या संस्थेसाठी रुग्णसेवा गाडी देण्यात आली. त्याचे उद्‌घाटन आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना महिला व बालविकास मंत्री यशोमती ठाकूर यांनी सांगितले की, गाडगे बाबांच्या तत्वाला मानणारे व विश्वास असणाऱ्या अनेक व्यक्ती या समाजात त्यांच्या विचाराने प्रेरित आहेत. त्यामुळे देशाला चांगले दिवस येणार आहेत यात शंका नाही. आज अनेकांकडे पैसा आहे. पण पैसे खर्च करणे त्यांच्याकडे दानत नाही. परंतु हावरे कुटुंबिय हे या सर्व गोष्टीला अपवाद असून त्यांनी स्वतःने ही गोष्ट स्वीकारून स्वखर्चाने पूर्ण करून दिली. तसेच आ.प्रशांत ठाकूर हे सुद्धा अशाच प्रकारे दुसरी वास्तू आम्हाला उभी करून देतील यात तिळमात्र शंका नसल्याचे त्यांनी सांगितले. कारण आ.प्रशांत ठाकूर हे आज वेगळ्या पक्षात असले तरी काही वर्षापूर्वी ते आमच्याबरोबर होते. त्यामुळे त्यांच्या कामाची मला

.../२

# शुक्रवारपासून आमदार चषक कबड्डी स्पर्धेचा थरार; प्रो कबड्डीतील नामवंत खेळाडूंचा समावेश

## विजेत्या संघास १ लाख रुपये व आमदार चषक; मान्यवरांची लाभणार मांदियाळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने जय भवानी नवतरुण मंडळाच्या वतीने दिनांक २२ ते २४ एप्रिल पर्यंत 'आमदार प्रशांत ठाकूर चषक' भव्य दिव्य कबड्डी स्पर्धा धरणा कॅम्प येथे होणार आहे. या स्पर्धेत प्रो कबड्डीतील नामवंत खेळाडूंचा समावेश असणार असून कबड्डीचा थरार क्रीडा रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

स्पर्धेचे उदघाटन शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी ०५ वाजता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री व विद्यमान आमदार आशिष शेलार, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सह कार्यवाह आस्वाद पाटील, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विक्रांत पाटील, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, उप महापौर सीता पाटील, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बाल कल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती सभापती संजना कदम, प्रमिला पाटील, अरुणा भगत, वृषाली वाघमारे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी, राम वरदायिनी ट्रस्टचे अध्यक्ष प्रतापराव शिंदे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तर बक्षिस समारंभ माजी मंत्री व विद्यमान आमदार रविंद्र चव्हाण व आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते २४ एप्रिलला होणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्या संघास ०१ लाख रुपये व आमदार चषक, उप विजेत्या संघास ५० हजार रुपये व आमदार चषक तर उपांत्य विजयी दोन्ही संघास प्रत्येकी २५ हजार रुपये व आमदार चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील मालिकावीरास दुचाकी मोटार सायकल, उत्कृष्ट चढाई आणि उत्कृष्ट पकड प्रत्येकी १० हजार रुपये तर पहिला व दुसरा दिवस मानकरीला प्रत्येकी ०५ हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धे चा क्रीडा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष शेखर कदम, सचिव प्रशांत कदम, खजिनदार जितेंद्र कदम यांनी केले आहे.

# निराधार लाभार्थी संजय गांधी योजनेच्या कार्यकक्षेत

## पनवेल तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना समिती गठीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पनवेल तालुक्यात आजपर्यंत एकूण ५२३२ प्रकरणे केली आहेत. म्हणजेच वर्षाला साधारण ५२ ते ५३ लाखाचा लाभ या लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होतो. पनवेल तालुक्यात मागील दिड वर्षात तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संजय गांधी योजनेंतर्गत एकूण ७९१ प्रकरणे मंजूर झाली आहेत. ७९१ नवीन लाभार्थ्यांना वेगवेगळ्या महिन्यात बैठका घेऊन मंजुरी दिलेली आहे. यामध्ये प्राधान्याने निराधार, विधवा,



अपंग, अनाथ मुले यांना प्राधान्य दिले आहे. कोविड काळात दुर्दैवाने ज्या महिलांना वैध्यव्य प्राप्त झाले अशा महिलांना या योजनेंतर्गत प्राधान्य देण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एकूण २० प्रकरणे मंजूर केली असून त्यांना संजय गांधी योजनेचा लाभ झाला आहे.

.../२

# काँग्रेसची ‘किशोरा’वस्था!

निवडणूक नियोजक आणि व्यवस्थापक या नात्याने प्रशांत किशोर हे प्रचारकाम करू लागले, त्याला एक दशक झाले. या काळात त्यांनी विविध पक्षांना आठ विजय मिळवून दिले, असे म्हणतात. यात भारतीय जनता पक्ष, तृणमूल काँग्रेस, नितीश–लालूप्रसाद–काँग्रेस यांचे महागठबंधन असे सर्व रंग आहेत. प्रशांत किशोर हे कारकीर्दीच्या विविध टप्प्यांवर नरेंद्र मोदी, ममता बॅनर्जी, नितीशकुमार, अरविंद केजरीवाल, कॅप्टन अमरिंदरसिंग अशा वेगवेगळी कार्यशैली आणि स्वभाव असणाऱ्या नेत्यांच्या जवळ होते. आता ते काँग्रेसच्या गोटात शिरले असले, तरी ही त्यांची पहिली खेप नाही. गेल्या काही वर्षांमध्ये प्रशांत किशोर हे काँग्रेसच्या नात्यातला ‘कधी शिशिर, कधी वसंत’ असा अनुभव घेत आहेत. हे प्रेम चार–पाच वर्षे चालले आहे. आता त्यांनी २०२४मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांसाठी काँग्रेसच्या नवसर्जनाचा आराखडा केला आहे. काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्याशी झालेली त्यांची चर्चा यशस्वी झाली असून, लवकरच पक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांची नेमणूक होईल, अशी अटकळ आहे. ती खरी होऊ शकते किंवा काँग्रेसच्या राजकारणाची शैली पाहता, ती अचानक शीतकपाटातही जाऊ शकते. प्रशांत किशोर यांनी मोदी–ममतांना मदत करावी, की केजरीवाल–राहुलना करावी, हा त्यांचा आणि त्यांची मदत घेणाऱ्यांचा प्रश्न आहे; मात्र यातून अनेक प्रश्न पडतात. यातला पहिला म्हणजे, प्रशांत किशोर हे व्यावसायिक सल्लागार आहेत की नेते आहेत? कारण ते आपला जो काही लाख–कोटींचा मोबदला असेल, तो घेऊन पक्षांना व्यावसायिक सेवा देतात, कधी कुणाच्या हातात चहाचा प्याला देतात, तर कधी कुणाला लाकडी बाजांवर बसवून गप्पा मारायला लावतात. मग त्यांना आता थेट राजकीय पक्षात पद कशासाठी हवे आहे? मागेही त्यांना नितीशकुमार यांनी आपल्या संयुक्त जनता दलात थेट उपाध्यक्ष केले होते. तेथे त्यांचे फार काळ जमले नाही ते सोडा. विशेष म्हणजे, पुढे एका मुलाखतीत अमित शहा यांनी ‘प्रशांत किशोर यांना आपणच संयुक्त जनता दलात पाठवले,’ असे पुसटसे सूचित केले होते. मग आताही त्यांचे काँग्रेसमधील बस्तान भलतेच कोणी तर बसवत नसेल ना? यापुढचा प्रश्न म्हणजे, बॅकरूममधून बाहेर पडून थेट विविध पक्षांच्या व्यासपीठांवर बसणाऱ्या प्रशांत किशोर यांची राजकीय विचारसरणी नेमकी काय आहे? त्यांना त्यांच्या व्यवसायासाठी भाजपपासून काँग्रेसपर्यंत आणि तृणमूलपासून आम आदमी पक्षापर्यंत कोणीही चालत असेल तर ते वेगळे; परंतु थेट पक्षात प्रवेश करतानाही त्यांची भूमिका अशीच असेल, तर त्यांचा खरा पक्ष कोणता समजायचा? अशा ‘सर्वपक्षसमभाव’ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळावे, यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या जिवाची तगमग कशासाठी होते? या पक्षांचा आत्मविश्वास संपला आहे, की त्यांच्यात कोणी रणनीतीकार शिल्लकच राहिले नाहीत? काँग्रेसची उद्ध्वस्त धर्मशाळा प्रशांत किशोर एकहाती बांधून काढणार असतील, तर लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या कुणालाही त्याचा आनंदच होईल; मात्र या सगळ्या नवरचनेत, २३ बंडखोर काँग्रेस नेत्यांना फारसे स्थान दिसत नाही. हे बंडखोर लोकनेते नसतीलही; पण ते काही पक्षाचे शत्रू नाहीत. त्यांनीही आपले आयुष्य पक्षाला दिलेच आहे. मुळात काँग्रेसवरची गांधी घराण्याची घट्ट पकड आणि राहुल गांधी यांचा अहोरात्र, मातीत गाडून घेऊन गंभीर राजकारण न करण्याची वृत्ती, यावर प्रशांत किशोर यांच्याकडे काही उत्तर असेल का? काँग्रेसला जवळपास दीड शतकाची देदीप्यमान आणि देशव्यापी परंपरा आहे. तिच्याशी प्रशांत किशोर यांचे नेमके काय वैचारिक नाते आहे, हे त्यांना कोणी विचारणार नाही. मुळात ते व्यावसायिक असल्याने, उद्या त्यांना जास्त पैसे देणारे एखादे कोणी भेटले, तर ते खांद्यावरचा काँग्रेसचा झेंडा गुंडाळून दुसऱ्याच झेंड्याकडे जातील. मोदींना २०१२मध्ये गुजरात विधानसभेत आणि २०१४मध्ये लोकसभा निवडणुकीत प्रशांत किशोर यांचा फार फायदा झाला, अशी चर्चा असते. असे असेल, तर भाजप व त्यांचे संबंध दुरावण्याची गरज नव्हती. पैशाचा तर काही प्रश्नच नसणार. या असल्या ‘अराजकीय’ सल्लागारांना प्रमाणाबाहेर महत्त्व येणे, म्हणजे राजकीय पक्ष आणि नेत्यांचा गंभीर लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडून गेल्याचे लक्षण आहे. ‘चाय पे चर्चा’ ही चतुराई असते; पण ती व्याजासारखी असते. तेच भांडवल होऊ शकत नाही. काँग्रेसचे नवसर्जन आजही शक्य आहे. ते सामान्य कार्यकर्ते, निष्ठावान नेतेच करू शकतात. कोते दरबारी राजकारण आणि शह–काटशह सोडून काँग्रेस नेते जिद्दीने मैदानात उतरले, तर आजही चित्र पालटू शकते; पण कोणाच्या तरी हातात जादूची कांडी आहे आणि तीच तारू शकते, अशा उच्छृंखल ‘किशोरा’वस्थेत काँग्रेस पक्ष चालला आहे. ही ‘किशोरावस्था’ संपून पक्षाला सळसळते, पराक्रमी चिरतारुण्य लाभो.

# इंडियन आयडल ठरलेल्या सागर म्हात्रे यांचे उरण नगरीत जंगी स्वागत



**दै.रायगड नगरी । उरण**

सोनी मराठी चॅनेल वरील आयडल मराठी स्पर्धेत प्रथम क्रमांकांनी विजयी ठरलेल्या कोप्रोली गावातील तरुण पिढीतील गायक सागर म्हात्रे यांचे उरण नगरीत जंगी स्वागत करण्यात आले. इंडियन आयडल ठरलेल्या सागर म्हात्रे यांनी प्रथम भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गावातील श्री महागणपतीचे दर्शन घेतले. यावेळी गावोगावच्या अनेक सुहासिनींनी इंडियन आयडल ठरलेल्या सागर म्हात्रे यांला ओवाळणी करून त्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील विश्वास म्हात्रे यांच्या कुटुंबात सागर म्हात्रे या तरुणाचा जन्म झाला आहे. त्याला लहानपणा पासून शिक्षणाबरोबरच गायनाची आवड आहे. सोनी या मराठी चॅनेलवर सुरु असलेल्या आयडल मराठी या गायनाच्या स्पर्धेत कोप्रोली या ग्रामीण गावातील सागर म्हात्रे या तरुणानी सहभाग घेतला होता.

आणि चिरनेर गावातील श्री महागणपतीच्या कुपा आशिर्वादाने तसेच ग्रामीण भागातील जनता जनार्दनाच्या आशिर्वादाने पहिला मराठी इंडियन आयडल ठरण्याचा बहुमान सागर म्हात्रे याला प्रसिद्ध गायक, संगितकार अजय – अतुल यांच्या उपस्थित मिळाला आहे.

एक ग्रामीण भागातील पहिला मराठी इंडियन आयडल ठरण्याचा बहुमान सागर म्हात्रे याला मिळाल्याने उरण तालुक्यातील गावोगावच्या अनेक तरुणांनी, नागरीकांनी ढोल ताशाच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले. तसेच सुहासिनीनी ओवाळणी करून सागर म्हात्रे यांचे स्वागत केले आहे.यावेळी सागर म्हात्रे या तरुणाला बघण्यासाठी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी तरुणांनी, नागरीकांनी गर्दी केली होती.

# कोरोना कहर ओसरला : कोविडसेंटर पासून मुरुड मधील विश्रामगृह मुक्त होणार कधी ?

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

दि.२२मार्च २०२० पासुन या देशावर कोरोनाचे महामारीचे मोठे संकट आले होते. या वेळी रुग्णालयात रुग्ण सुविधा कमी पडत असल्याने शाळा, महाविद्यालय, शासकीय विश्रामगृह ताब्यात घेऊन या ठिकाणी कोविड केंद्र सुरू करण्यात आली होती. आता हे संकट सरले तरी मुरुडचे शासकीय विश्रामगृह अजून काही कोरोनाच्या कचाट्यातून मुक्त झालेले नाही. त्यामुळे मुरुड जंजिरा हा पर्यटन स्थळ असल्याने येथे अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी, पर्यटक येत असतात त्यांच्या निवासाची गैरसोय होत आहे. त्यामुळे हे शासकीय विश्रामगृह कोरोनाच्या कचाट्यातून मुक्त होणार कधी?असा सवाल उठत आहे.



कोरोनाची लाट उसळली होती ती आता ओसरली आहे. सर्व नियम शिथील करण्यात आले आहेत. सर्व पर्यटन स्थळे पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आहेत. सर्व शाळा, महाविद्यालय पुर्ण पणे सुरू झाली आहेत. पर्यटक मुरुडला येऊ लागले आहेत.

मुरूड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी सुद्धा येत आहेत. त्यांच्या निवासाची व्यवस्था ही शासकीय विश्रामगृहात होत नसल्याने त्यांना न थांबताच परतावं लागत आहे. तरी हे मुरुडचे शासकीय विश्रामगृह अजूनही कोरोनाच्या कचाट्यातून मुक्त झालेले नसल्याने हे विश्रामगृह कोरोनाच्या कचाट्यातून कधी मुक्त होणार ? असा सवाल उठत आहे. शासनाच्या संबंधित महसूल, आर–ोग्य व सार्वजनिक बांधकाम खात्याने यात लक्ष पुरवून सार्वजनिक बांधकाम खात्याचे विश्रामगृह लवकरात लवकर खुले व्हावे.अशी भावना व्यक्त केली जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सर्वसामान्य जनतेचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी शासन प्रयत्नशील : ना.आदिती तटकरे

जास्त रुग्णांना त्याचाही लाभ मिळणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत त्या केंद्रांतर्गत रक्त तपासणी सुविधा उपलब्ध आहे. मात्र बहुतांश नागरिकांना याविषयीची माहीत नसल्याने ते एकतर खासगी रुग्णालयात जातात नाहीतर जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन उपचारासाठी आवश्यक असलेल्या चाचण्या करतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात रक्त तपासणी होत आहे याचा प्रसार होण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सूचित केले. रायगड जिल्ह्यात होत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम होणार आहे. भविष्यात सर्व आजारांवर रायगड जिल्ह्यातच उपचार होतील. तसेच तज्ञ वैद्यकीय अधिकारी सुद्धा उपलब्ध होतील, असा विश्वास यावेळी पालकमंत्री कु.तटकरे यांनी व्यक्त करून त्यांनी कोरोना काळात आरोग्य यंत्रणेसह इतर विभागानेसुद्धा उल्लेखनीय कार्य केले आहे. कोरोना काळात नर्सिंग स्कूलची इमारत ही रुग्णांसाठी देण्यात आली. त्या इमारतीचा लाभ वैद्यकीय महाविद्यालयासाठी झाला आहे. या सर्वांच्या प्रयत्नातून रायगड जिल्हा हा कोरोनामुक्त झाला आहे. वैद्यकीय महाविद्यालय उभारणीकरिता व कोविड महामारीच्या कालावधीमध्ये परिचारिका महाविदयालयाची इमारत अत्यावश्यक सेवेकरिता उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि या कालावधीमध्ये रुग्ण सेवेसाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने तसेच आरोग्य विभागाच्या सर्व सहकाऱ्यांबद्दल गौरवोद्गार काढले.

या उपक्रमाच्या निमित्ताने प्राथमिक स्वरूपात पालकमंत्री कु.तटकरे यांच्या हस्ते आयुष्यमान भारत हेल्थ कार्डचे ८० लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले. तसेच त्यांनी जिल्हा रुग्णालयामध्ये उभारलेल्या शिबिरातील विविध स्टॉल्सना, जिल्हा क्षयरोग कार्यालयाच्या माहितीपर स्टॉलला व एच.आय.व्ही. एड्स जनजागृती प्रदर्शनालाही भेट दिली. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या उल्लेखनीय कामकाजाची माहिती देणाऱ्या चाकोरीच्या पलीकडे या पुस्तिकेचे प्रकाशन पालकमंत्री कु.आदिती तटकरे व उपस्थित इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात दि.१८ ते २२ एप्रिल २०२२ दरम्यान आरोग्य मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने अलिबाग तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, कान, नाक, घसा, दंत चिकित्सा, भिषक, रक्त तपासणी, रक्तदान, अवयवदान, टेली–कन्सल्टेशन व आयुष्यमान भारत हेल्थ कार्ड याबाबत रुग्णांनी लाभ घ्यावा, याकरिता या शिबिराचे आयोजन केले असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी प्रास्ताविकात सांगितले.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ.तिवारी (सर्जन), डॉ.विश्वेकर (अस्थिरोग तज्ञ), डॉ.निशिगंधा म्हात्रे (त्वचारोग तज्ञ), डॉ.सौरभ पाटील (रेडिओलॉजिस्ट), जिल्हा रुग्णालयातील सर्व तज्ञ, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वृंद, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र सर्व, सामुदायी आरोग्य अधिकारी तसेच आरबीएसके कार्यक्रमाचे सर्व वैद्यकीय अधिकारी व एनएचएम विभाग यांचे विशेष सहकार्य लाभले.

या शिबिराचा एकूण ५०६ रुग्णांनी लाभ घेतला असून यामध्ये ८० नागरिकांना आयुष्यमान भारत हेल्थ कार्ड वितरित करण्यात आले. मरणोत्तर नेत्रदान करण्याकरिता ०७ जणांनी संमतीपत्र दिले. तसेच या शिबिरामध्ये सर्जरीकरिता ७ रुग्णांचे निदान झालेले असून लवकरच अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथे त्यांची सर्जरी होणार आहे. तसेच मोतीबिंदू सर्जरीकरिता १२ लोकांचे निदान झालेले असून त्यांचीही सर्जरी जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिकलसेल समन्वयक श्री.प्रतिम सुतार यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद गवई यांनी केले.

## संत गाडगेबाबांचे काम हे मानवतेचे काम असल्याने ते निरंतन पुढे चालतच रहावे : ना.यशोमती ठाकूर

पूर्ण माहिती असल्याचे त्यांनी सांगितले. उज्वलाताई हावरे ही अशी व्यक्तीमत्व आहे ती कधीही प्रसिद्धीच्या मागे न लागता आपल्याला जबाबदारी दिली आहे ती पार पाडणे यातच धन्यता मानते व तीचे काम मी पहिल्यापासून बघत आल्याने तीने केलेल्या मागणीप्रमाणे सिडको व महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करून संत श्री गाडगेबाबा मिशन धर्म शाळेसाठी प्लॉट उपलब्ध करून देईल, असे आश्वासन त्यांनी दिले. तर यावेळी बोलताना आ.प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, दररोज वेगवेगळे कार्यक्रम करत असतो. परंतु त्या कार्यक्रमापैकी एखादा कार्यक्रम कायम स्मरणात राहतो. त्यातील आजचा कार्यक्रम आहे. आजचा खऱ्या अर्थाने प्रेरणा दिवस असून या कामाचे अनुकरण प्रत्येकाने करून संत गाडगे महाराज यांचा आदर्श सर्वांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना उज्वलाताई हावरे यांनी सांगितले की, आज मला स्वप्नपूर्ती झाल्याचा आनंद होत आहे. कॅन्सर रुग्ण आपल्या कुटुंबात असल्यावर त्या कुटुंबाची काय मानसिकता होते हे मी लहानपणीच पाहिले आहे तसेच अनुभव घेतला आहे. ही वास्तू म्हणजे एक मनाला समाधान देणारी वास्तू असून या ठिकाणी ६२ बेडची व्यवस्था केली आहे. साधारण वर्षभरात २२ हजार लोक या वास्तूचा फायदा व उपयोग करून घेतील. अशा प्रकारच्या कार्यामुळे नवनवीन काम करण्याची प्रेरणा मिळते व यासाठी समाजाचे व कुटुंबियांचे सहकार्य नेहमीच आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तर कार्याध्यक्ष मधुसूदन मोहिते यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, १९५२ मध्ये गाडगे महाराज मिशनची स्थापना केली असून लोकांची व गोरगरीबांची सेवा करा, भूकेलेल्यांना अन्न द्या, गरजूंना शिक्षण द्या हा मानवतेचा संदेश गाडगे बाबांनी आम्हाला दिला आहे त्याचे आचरण आम्ही करत असून संपूर्ण महाराष्ट्रात संस्थेच्या मार्फत काम सुरू आहे. या कार्यक्रमाला हातभार लावण्याची उज्वलाताई यांची आत्मिक ईच्छा होती ती आज पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास महाराष्ट्रातून मिशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित होते.

## निराधार लाभार्थी संजय गांधी योजनेच्या कार्यकक्षेत

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दि. २४ मार्च २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार पनवेल तालुक्यासाठी संजय गांधी निराधार योजना समिती गठीत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन, सामाजिक व विशेष सहाय्य विभाग यामध्ये समितीच्या बैठकीबाबत मार्गदर्शक सूचनाही दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने समितीच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२० एप्रिल) तहसीलदार कार्यालय पनवेल येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीसाठी उपस्थित असलेल्या नवनियुक्त समितीचे अध्यक्ष दर्शन ठाकूर व सदस्य तसेच शासकीय सदस्य यांचे महसूल प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले. विशेष सहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य योजना, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य आदी योजनांबाबत नायब तहसीलदार तथा संजय गांधी योजनेकगे आहरण व संवितरण अधिकारी एकनाथ नाईक यांनी सविस्तर माहिती देऊन कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष दर्शन ठाकूर व सदस्य तसेच शासकीय सदस्य सचिव तथा तहसिलदार पनवेल, शासकिय सदस्य, गटविकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल संजय भोये यांच्या उपस्थितीत समितीची बैठक होऊन, संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजना आदी लाभार्थ्यांच्या प्रकरणांना मंजूरी देण्यात आलेली आहे. या बैठकीत संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत ४९ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली तर केंद्र पुरस्कृत, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत ४ प्रकरणे मंजूर करण्यात आली असून एकूण ५३ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकरणांमध्ये दर प्रति महिना रक्कम रु. १०००/– ते १२००/– मिळून एकूण रक्कम रु. ५२,४००/– तसेच केंद्र पुरस्कृत, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना एकूण ४ प्रकरणे ८०,०००/ एकूण १,३२,४००/– इतके अनुदान लाभार्थ्यांना वाटप करण्यासाठी बैठकीत मंजूरी देण्यात आली आहे.

# निशांत करंदीकर करणार वर्ल्ड स्कूल जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधीत्व



**दै.रायगड नगरी । मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती विलेपार्ले (रजि.) संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल पार्लेचा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा जिम्नॅस्टिक खेळाडू निशांत करंदीकर हा १३ ते २३ मे २०२२ या कालावधीत फ्रांस येथे होणाऱ्या आयएसएफ वर्ल्ड स्कूल जिम्नॅस्टिक्स स्पर्धा २०२२ साठी भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

निशांत करंदीकर हा खेळाडू १८ वर्षांचा असून तो साठ्ये महाविद्यालय, विलेपार्ले येथे शिक्षण घेत आहे. २०१४ पासून प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलात निशांत आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स खेळाचा सराव करत आहे. त्याने ८ वर्षाच्या कारकिर्दीत एकूण २४ सुवर्ण, २६ रौप्य व १३ कांस्य पदके पटकावली आहेत. त्याने २०१७ मध्ये कोलकाता येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत १४ वर्षांखालील वयोगटात सुवर्ण पदक तसेच २०१९ मध्ये गुजरातमधील सूरत येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत निशांतने रौप्य पदक पटकावले आहे. निशांतने २०२१ मध्ये बांगलादेशमधील ढाका येथे झालेल्या साऊथ सेंट्रल एशीयन चॅम्पीयमशीप आंतरराष्ट्रीय स्पर्धेत २ रौप्य आणि २ कांस्य पदके पटकावली आहेत.

निशांतला प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अ. राणे. निशांतचा प्रशिक्षक शुभम गिरी, जिम्नॅस्टिकचे प्रशिक्षक शिवछत्रपती पुरस्कार विजेते हरीश परब आणि जिम्नॅस्टिक प्रशिक्षक नीलम बाबरदेसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन निशांतला लाभत आहे.

निशांत करंदीकर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना केलेल्या कामगिरीची दखल घेऊन महाराष्ट्र राज्याचे क्रीडामंत्री सुनील केदार यांनी निशांतसह भारतीय संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला आणि पुढील कामगिरीस शुभेच्छा दिल्या. भारतीय संघ या प्रमाणे आहे महेंद्र बांभुळकर–प्रशिक्षक, आर्यन दवंडे महाराष्ट्र, मानस मनकवळे महाराष्ट्र, निशांत करंदीकर महाराष्ट्र, दीपेश लष्करीमध्यप्रदेश, प्रणव मिश्रा उत्तरप्रदेश हे छायाचित्रात दिसत आहेत.

मुंबई नगरीचे माजी महापौर–माजी आमदार डॉ रमेश यशवंत प्रभू यांनी १९९८ साली प्रबोधबकर ठाकरे क्रीडा संकुल नावाचे एक रोपटे लावले त्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाला आहे.

सुरवातीला संकुलात असणाऱ्या जागतिक मापाच्या तलावात फक्त जलतरणाचे प्रशिक्षण दिले जात होते आता या ठीकाणी जल तरणाबरोबर जिम्नॅस्टिक, एअर रायफल शुटिंग, क्रिकेट, फुटबॉल, पिकलबॉल, टेबल टेनिस , कराटे, ज्युडो, स्केटिंग, मल्लखांब, व्यायाम, स्पोर्ट्स रिकव्हरी सेन्टर, आदी क्रीडा प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण तज्ज्ञ प्रशिक्षकांडून दिले जात आहे. संकुलाचे अनेक खेळाडू, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, स्पर्धांमध्येभाग घेत पदके मिळवीत आहेत, डॉ रमेश प्रभू यांचे एक स्वप्न होते की माझ्या क्रीडा संकुलाच्या खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करावे, आणि त्या दृष्टीनेपदाधिकारी, विश्वस्तआणि प्रशिक्षक यांचे प्रयत्न सुरू आहेत.

# श्री. भवानी माता मंदिराचे वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन ; खा.सुनील तटकरे यांची प्रमुख उपस्थिती

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील मुठवली खु.येथील ग्रामस्थांचे प्रचंड श्रद्धा व भक्तीचे प्रतिक असलेल्या श्री. भवानी माता मंदिराचे वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन शनिवार दि.२३ एप्रिल रोजी करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे.

.वै.गुरूवर्य अलिबागकर बाबा,गोपाळ बाबा वाजे व धोंडू बाबा कोलाटकर यांच्या क्रुपाशिर्वादाने व ह.भ.प.नारायण महाराज वाजे ( मठाधिपती पंढरपूर ) व ह.भ.प.गुरूवर्य भाऊ महाराज निकम यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या वर्धापन दिन सोहळ्या प्रसंगी स.७ ते ८ देवांवर अभिषेक व कळशारोहन८ ते,९ ध्वजारोहण व.ज्ञानेश्वर पूजन,९ ते १२:३० पर्यंत श्री.ज्ञानेश्वरीचे ९ व १२ व्या अध्यायाचे सामुदायिक पारायण,,दु.३ ते ४ श्री. सत्यनारायणाची महापूजा,सायं.५ ते ६ ह.भ.प.अशोक महाराज तुपकर यांची प्रवचनसेवा, ७ ते ८ धामणसई, किल्ला,मेढा,आरे,कोलाड, ऐनघर आदी पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे सामुदायिक हरिपाठ,८ ते ९ महाप्रसाद व ९ ते ११ झी टॉकिज फेम तथा महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार प्राप्त ह.भ.प.अश्विनीताई म्हात्रे,पूणे यांची किर्तनसेवा तद्नंतर जागर भजन आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या सप्ताह प्रसंगी रायगडचे खा.सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे,रा.जि.राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष मधुकर पाटील,तालुका समन्वय समिती अध्यक्ष विजय मोरे,तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष विनोद पाशिलकर,पिंगळसई माजी.सरपंच अनंत देशमुख,युवक अध्यक्ष जयवंत मुंढे,युवती अध्यक्षा रविना मालुसरे आदी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.या सप्ताहाचे यशस्वीतेसाठी. ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच नवतरुण मित्र मंडळ मुठवली खु। आदी मोलाची कामगिरी बजावत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## चिर्ले गावात शाळापूर्व तयारी अभियान संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चीर्ले येथे शाळापुर्व तयारी अभियानांतर्गत बालमेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रभात फेरी, इशस्तवन, उद्घाटन, पाहुण्यांचे स्वागत तसेच विद्यार्थ्यांचे शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, भावनात्मक विकास, भाषा विकास असे विकासपत्र देण्यात आले.

यावेळी उपस्थित चीर्ले स्कुल कमिटी अध्यक्ष काका उर्फ सुधाकर पाटील, उपाध्यक्ष अनुराज मढवी, व इतर सदस्य तसेच चीर्ले ग्रा. पं. उपसरपंच समिक्षा मढवी, सदस्य समाधान माळी, हिराजी मढवी, धोंडू पाटील, ज्ञानेश्वर घरत, मधुकर मढवी, मुख्याधीपिका व इतर शिक्षक वर्ग व नागरिक उपस्थित होते.

## आत्महत्ये प्रकरणी तिघा जणांच्या विरोधात पोलिसांनी केला गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापूर येथे ६२ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय धोंडू पवार असे मृत व्यक्तीचे नाव आहे

सुकापूर येथे न्यू प्रेरणा सोसायटी येथे राहणारे विजय पवार यांच्या सून अर्पिता हिने मुस्कान ग्रुप या नावाने ग्रेटर बँक खारघर येथून तीन लाखांचे सामूहिक कर्ज घेतले होते. यातील काही हप्ते थकले होते हे कर्ज वसुली करण्यासाठी बँकेतून महिला आल्या होत्या कर्जाचे हप्ते भर नाहीतर तुमच्या घरातील सामान जप्त करून पोलिसांत तक्रार करू असे धमकवल्यामुळे विजय पवार हे मानसिक तणावाखाली होते. याच नैराश्यातून त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

या प्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी कर्जाच्या वसुलीसाठी धमकवणाऱ्या दोन महिलांसह खारघर येथील ग्रेटर बॉम्बे को.ऑप. बँकेतील संबंधित अधिकाऱ्यांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# खूप अभ्यास करा..रायगड जिल्ह्याचे नाव उज्वल करा : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील पहिल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची पहिली तुकडी पाहताना होत असलेला आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही. तब्बल एका दशकानंतर रायगडकरांची स्वप्नपूर्ती होताना खूप समाधान मिळत आहे. मुलांनो आम्ही आपल्या सोबत आहोत..खूप अभ्यास करा..रायगड जिल्ह्याचे नाव उज्वल करा, असे आवाहन पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आज येथे केले.

येथील अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आरसीएफ कॉलनी, कुरुळ येथे अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधताना त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक श्री.अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी श्री.अमोल यादव, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.संजय सोनुने, सह अधिष्ठाता डॉ.गिरीष ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, कार्यकारी अभियंता श्री.जगदीश सुखदेवे, उपविभागीय अधिकारी श्री.प्रशांत ढगे, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री.सुनील चव्हाण, आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष वझे, जनसंपर्क वरिष्ठ व्यवस्थापक श्री.प्रमोद देशमुख तसेच वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक,



अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, हे महाविद्यालय याच वर्षी सुरू होण्यासाठी विविध स्तरांवर अथक प्रयत्न करावे लागले. अनेक अडचणी आल्या परंतू सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करून अखेर हे वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आम्ही सर्वजण यशस्वी झालो. मात्र हे यश केवळ आमचे नसून तुम्हा विद्यार्थ्यांचे आणि तुमच्या पालकांचे आहे. कारण आपण आपल्या भविष्यासाठी महाविद्यालयाची निवड करताना या अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची निवड केलीत. कोणतेही काम प्रयत्नांना प्रतिसाद मिळाल्यानंतरच यशस्वी होते. आमच्या प्रयत्नांना आपण दिलेल्या प्रतिसादामुळेच हे यश मिळाले आहे. त्यामुळे मी आपले व आपल्या पालकांचे मनस्वी आभार मानते.

या महाविद्यालयाची ही नवीन सुरूवात असल्याने निश्चितच सोयी-सुविधांच्या दृष्टीने काही अंशी कमतरता आहे मात्र पुढील काही दिवसांमध्ये या कमतरता दूर केल्या जातील, अशी ग्वाही देवून विद्यार्थ्यांना तुम्ही निश्चिंत राहा, अभ्यासावर लक्ष केंद्रीत करा, आम्ही सदैव आपल्या सोबत आहोत. येथील सोयी-सुविधा, आपली सुरक्षा ही आमची सर्वांची जबाबदारी आहे, आम्ही सर्व ही जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडू, असेही त्या म्हणाल्या. शेवटी हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू होण्यासाठी आरसीएफ प्रशासनाने केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल पालकमंत्र्यांनी आरसीएफ प्रशासनाचे आणि उपस्थित आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष वझे, जनसंपर्क वरिष्ठ व्यवस्थापक श्री.प्रमोद देशमुख यांचे पुष्पगुच्छ देवून विशेष अभिनंदन केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक श्री.अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी श्री.अमोल यादव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष वझे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विशेष पाठपुरावा करून, अथक परिश्रम घेवून हे वैद्यकीय महाविद्यालय सुरू केल्याबद्दल पालकमंत्री कु.तटकरे यांचे अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देवून विशेष आभार मानले. यावेळी कार्यक्रम संपल्यानंतर पालकमंत्र्यांनी येथील सोयी-सुविधांबाबत, विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींबाबत उपस्थित विद्यार्थ्यांशी व प्राध्यापकांशी अनौपचारिक चर्चाही केली व त्यांच्या अडचणी तात्काळ सोडविण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती वंदना व दीपप्रज्वलनाने झाली. तसेच पालकमंत्री कु. आदिती तटकरे व उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी तसेच प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता एस.एम.सोनुने यांनी केले, सूत्रसंचालन डॉ.रुबिया शेख यांनी केले तर आभार डॉ.प्रणाली शिंपी यांनी मानले.

## जंगलातील वणव्यांच्या संख्येत मोठी वाढ ; वनखाते मात्र निद्रिस्त

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

दिवसेंदिवस जंगल भागात लावल्या जाणाऱ्या वणव्यांच्या संख्येत मोठी वाढ होत चालली आहे. तर मागील कित्येक वर्षांच्या तुलनेत या वर्षी मात्र वणव्यांचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून येत आहे.

एकीकडे शासन वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनासाठी लाखो करोडो रू. खर्च करीत आहे. परंतू त्याचवेळी आहेत ती जंगले वाचविण्यासाठी मात्र कोणतेही प्रयत्न करीत नसल्याचे एकंदरीत परिस्थितीवरून दिसून येत आहे. दर वर्षी जंगल भागात लावल्या जाणाऱ्या वणव्याने जंगल संपत्तीची फार मोठी हानी होऊन जैवविविधतताही धोक्यात आली आहे.



रोहे तालुक्यात होळी सणाच्या प्रारंभ पासून वणवे लावण्याची मालिका सुरू झाली असून ती थांबण्याचे नाव नाही.तर रात्रीच्या वेळेस सहज जरी अवतीभवती नजर टाकली असता सर्वत्रच जंगलभाग अक्षरक्षः होरपळत असल्याचे दिसून येते. जवळजवळ महिन्या भरापासून जंगलभाग होरपळत असताना संबंधित शासनाने मात्र याबाबत काहीही कार्यवाही केली नसल्याचे स्पष्ट होत आहे.

तरी लावल्या जाणा-या वणव्यांबाबत संबंधित प्रशासन यंत्रणेने ठोस पावले उलण्याची आवश्यकता असल्याचे पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून बोलले जात आहे.

## जुन्या भाजी मार्केट परिसरात अनधिकृतरित्या गजरे विकणाऱ्यांवर कारवाई करावी : कु. रुचिता लोंढे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील जुने भाजी मार्केट विभागातील कृष्णाळे तलाव व त्यासमोरील गाडीपार्किंगच्या जागेत अनधिकृत रित्या गजरे विक्रेते वास्तव्य तसेच सर्व विधी त्यापरिसरात करत असल्याने नागरिकांमध्ये संताप असून, या संदर्भात पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करावी अशी मागणी नगरसेविका कु. रुचिता लोंढे यांनी केली आहे.



अनधिकृत रित्या गजरे विकणारे हे पनवेल महानगरपालिकेचे रहिवासी नसतानाही ते अनधिकृत रित्या इथे राहून परिसर अस्वच्छ करत आहेत. सुरुवातीला काही प्रमाणात असणारी हि लोक आता १५० च्या घरात गेलेली आहेत. वेळीच जर याला आळा घातला नाही तर इथली संख्या सुध्दा वाढेल व त्यांना काढून टाकणे नामुश्कील होईल.

असे नगरसेविका रुचिता लोंढे यांनी नुकतेच महासभेत सांगितले व यावर त्वरित कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

## मा.उपमहापौर विक्रांत पाटील यांनी पाडा मोहल्यात करून घेतली नाले-सफाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग १८ मधील पाडा मोहल्यात नाले आणि गटारांची दुरवस्था झाली होती,सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढत होते.गटारीचे पाणि उलटे फिरून नागरिकांच्या घरात जात होते.



या बाबतची तक्रार परिसरातील नागरिकांनी कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांच्याकडे केली.नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आणि रो-गराई पसरण्याची भीती लक्षात घेता नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरित महापालिकेच्या आरोग्य अधिकार्यांशी बोलून घेतले आणि तातडीने पाडा मोहल्यातील साफसफाई करून घेऊन मोहल्यातील नागरिकांना दिलासा दिला दिला.रमजानच्या पवित्र महिन्यात नालेसफाई करून घेतल्याबद्दल मोहल्यातील नागरिकांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांचे आभार मानले.

## दिशादर्शक फलकांवर विविध जाहिरातदारांचे अतिक्रमण: कारवाईची मागणी तर सिग्नल यंत्रणाही धूळखात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिशादर्शक फलक,सिग्नल व्यवस्था हि वाह-तुक कोंडी टाळण्यासाठी अथवा वाहतुक कोंडीवर नियंत्रणासाठी उपाययोजना असते.मात्र पनवेल परिसरात बहुतांशी ठिकाणी दिशादर्शक फलकांवर राजकारण्यांसह इतर अनेक संस्थांनी अतिक्रमण करीत या दिशादर्शक फलकांवर बॅनर लावुन या फलकावरील मजकुर पूर्णपणे झाकला आहे. पनवेल मध्ये एक नव्हे तर बहुतांशी ठिकाणी हे सर्रास पहावयास मिळत असुन प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे.

सायन पनवेल महामार्गावर उभारलेले खारघर, कळंबोली त्याठिकाणच्या स्कायऑक वर सर्रास दिशादर्शक फलकांवर लागलेले बॅनर नजरेस पडत आहेत.पनवेल शहरात देखील पालिका स्थापनेला सहा वर्षाचा कार्यकाळ लोटला तरी अंतर्गत रस्त्यावर पूर्वाश्रमीच्या नगरपरिषदेचे दिशादर्शक फलक ला-वलेले आहेत.सायन पनवेल महामार्गावर बहुतांशी वेळेला दिशादर्शक फलकांवर लावलेल्या बॅनरमुळे वाहन चालकांमध्ये गोंधळ निर्माण होतो. राजकीय पक्षांशी संबंधित असल्याने या अनधिकृत बॅनर्सवर कारवाईसाठी देखील कोण पुढे धजावत नसल्याचे दिसून येत आहे. या व्यतिरिक्त शहरात बहुतांशी ठिकाणी सिग्नल यंत्रणेत बिघाड झालेला असून सिग्नल यंत्रणाच धूळखात पडली आहे.

सायन पनवेल महामार्गावर तळोजा लिंक रोडला मोडकळीस आलेली सिग्नल यंत्रणा सहजच नजरेस पडते. तळोजा लिंक रोडला जाण्यासाठी या मार्गावर सतत वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे याठिकाणी चार रस्त्यावर सर्वच बाजूनी वाहन येत असतात.

कोणतीही सिग्नल व्यवस्था कार्यान्वित नसल्याने याठिकाणी अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. पनवेल शहरात प्रवेश करण्यापूर्वी मार्गावरच ठाणा नाका वरील सिग्नल बहुतांशी वेळेला बिघाड झालेला असतो.

शहरात अंतर्गत सिडको नोड मध्ये सिडको मार्फत ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावले आहेत.या फलकावरच मोठ्या प्रमाणात बॅनर्स लावले आहेत. एखाद्या सेक्टर मध्ये जाण्याचे झाल्यास या अनाधिकृत बॅनर्समुळे योग्य दिशेने जाता येत नसल्याची तक्रार अनेक जण करतात.

शहरात अनधिकृत बॅनर बाजीला मोठ्या प्रमाणात पेव फुटले आहेत.यामध्ये राजकारणीच आघाडीवर आहेत.वाढदिवस शुभेच्छा,महोत्सवाचे आयोजन,नेत्यांच्या स्वागताचे अनधिकृत बॅनर्स महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत आहे.जाहिरात धोरणाची यामध्ये मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असताना प्रशासन राजकीय हस्तक्षेपामुळे कारवाईस पुढे धजावत नसल्याचे दिसून येते.

शहरात अनधिकृत बॅनर्समुळे विद्रुपीकरण होतेच त्या व्यतिरिक्त बॅनर्स लावलेले वेळेवर काढले जात नसल्याने अनेकवेळा लटकलेले बॅनर्स कोसळुन अपघाताचा धोका देखील निर्माण होऊ शकतो. विशेष म्हणजे शहराच्या विकासाच्या गप्पा मारणाऱ्या राजकारण्यांचीच हे अनधिकृत बॅनर्स लावण्याबाबत चढाओढ असल्याचे दिसुन येते.

## महावितरणाची अतिरिक्त सुरक्षाठेव भरण्यास शिवसेनेचा तीव्र विरोध, निवेदन सादर



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

विज वितरण कंपनीने ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा (ॲडिशनल सिक्युरिटी डिपॉझिट)चा झटका दिला आहे.ऐन उन्हाळ्यात ग्राहकांना आलेल्या जादा वीज बिलांसह अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा करावी असे बिल महामंडळाकडून ग्राहकांना देण्यात आली असून हे आकारनी बिल भरण्यासशिवसेनेने कडवा विरोध केला आहे.

आधीच मागील काही महिन्यांपासून सतत वीज बिलात वाढ होऊन येणाऱ्या विज बिलांमुळे वीजग्राहक बेजार झाले आहेत.त्यातच या वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने अतिरिक्त ठेव बिल पाठवून सामान्य ग्राहकांची आर्थिक लूट सुरू केली आहे. विज वापराचे आकार कमी मात्र बिलात स्थिर आकार, वीज शुल्क, इंधन समायोजन आकार,विविध प्रकारचे कर वसूल करून सामान्य वीज ग्राहकांकडून लुटमार सुरू आहे. ग्रामीण आणि शहरी भागात नियमित वीजपुरवठा करण्यात वीज वितरण कंपनी अपयशी ठरत असताना एप्रिल महिन्यात अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा झटका ग्राहकांना दिला आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ड्रिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेडने १० जानेवारी २००२ च्या आदेशानुसार या ठेवीत वाढ केली आहे.

विज ग्राहकांना दर माहे विज वापरान-ुसार अतिरिक्त ठेवीची रक्कम ठरविण्यात आले असल्याचे समजते. माहे एप्रिलच्या उकाड्यामुळे ग्राहकांकडून एसी, फॅन आणि कूलरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

जादा युनिटचा वापर झाल्याने एप्रिल महिन्याचे बिलही अनेक ग्राहकांना हजारांच्या घरात आहे.त्या सोबतच अतिरिक्त ठेव बिलांचा वाटपही तालुक्यातील सर्व गावात झाला असल्याने विज ग्राहक चिंतेत आणि संभ्रमात पडला आहे. आज दिनांक २१ एप्रिल २०२२ रोजी म्हसळा तालुका शिवसेनेच्या वतीने महावितरण कार्यालयात जाऊन पटवारी यांना निवेदन सादर करून येत्या १५ दिवसात आमच्याशी चर्चा करण्याची मागणी शिवसेनेतर्फे करण्यात आली आहे. या प्रसंगी तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, क्षेत्र संघटक रविंद्र लाड, जेष्ठ शिवसैनिक शंकर कासार, गटनेते मुन्ना पानसरे, बाळा म्हात्रे, अमित महामूनकर, कौस्तुभ करडे, विशाल सायकर, हेमंत नाक्ती, राजाराम तिलटकर, चंदू गाणेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

## शिवसेना तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांच्या आक्रमक पवित्रा

### चिरनेर येथील महावितरणाचे कार्यालय पुन्हा सुरु

**दै.रायगड नगरी । उरण**

काही दिवसांपूर्वी महावितरणाकडे कार्यालय भाडे देण्यास पैसे नसल्याने चिरनेर महावितरण कार्यालय बोकडविरा येथे हलविले होते.परंतू त्यावेळी तत्काळ शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी महावितरणाला पत्रव्यवहार करुन आंदोलनाचा ईशारा दिला.त्यांच्या या पवित्र्यामूळे पुन्हा महावितरणाचे कार्यालय चिरनेर येथे सूरु करण्यात आले.त्यामूळे चिरनेर परीसरातील जनतेने संतोष ठाकूर यांचे आभार मानले.

कार्यालय भाडे देण्यास पैसे नसल्याचे कारण पूढे करत महावितरणाच्या उरण उपविभागाने चिरनेर येथील सूमारे ५० वर्षाहून जास्त काळ चिरनेर येथे आसलेले कार्यालय बोकडविरा येथील सिडकोच्या जागेत हलविले होते.

त्यामुळे चिरनेर परिसरातील जनतेचा पैसा आणि वेळ वाया जाणार असल्याने जनतेत संतापाची लाट उसळली होती. भरमसाठ विज बिले आकारणारे उरण महावितरण कंगाल झाले आसल्याच्या



भावना देखील जनतेने व्यक्त केल्या गेल्या होत्या.

हि गोष्ट उरण तालुका शिवसेना तालुका प्रमुख संतोष ठाकूर यांना समजताच त्यांनी उरण उपविभागाचे उपअभियंता विलास सोनवणे यांची भेट घेतली व महावितरणाला लेखी पत्र देवून आंदोलनाचा इशारा दिला होता.तसेच महावितरण कार्यालयातील अभियंता हा चूकिचा निर्णय घेवून आपला मनमानीपणा चालवत असतील तर ते या परिसरातील नागरिक सहन करणार नाहीत.त्यामूळे कार्यालय चिरनेर येथे पून्हा परत चालू करावे आशी विनंती वजा समज ही त्यांनी दिली होती.त्यांच्या आक्रमक पवित्र्याला यश मिळाले आसून आठवड्याभरात कार्यालय चिरनेर येथे पून्हा सूरु करण्यात आले.